जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२६/०७/२०२३
## दि.२५/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ३४८/२०२३,भादविक ३२६,३२४,३२३,५०४,५०६,३२६,३२४,३२३,५०४,५०६,१४३,१४४,१४७, १४८,१४९,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | मुकेश बोळेगावे,वय २४ वर्षे,रा.सदशिव हॉटेल,चंदननगर,पुणे |
| **आरोपीत** | १.अक्षय बाबाजी जगताप,वय २५ वर्षे,रा.मित्र मंडळ सोसायटी.लेन नं.१,वडगाव-शेरी,पुणे (अटक) व त्याचे इतर चार साथीदार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २५/०७/२०२३ रोजी रात्री ००/३० वा.सदाशिव हॉटेल व बार,चंदननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद आ.क्र.१ याचे चारचाकी गाडीची बापु शितोळे यांचे गाडीला धडक बसली होती. त्याबाबत बाळु पवने व संभाजी खरड यांनी त्यास विचारणा केल्याचा राग मनात धरुन,त्याने बाळु पवने यांना हाताने मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी हे त्यांना सोडवण्यासाठी बाहेर गेले असता,आ.क्र.१ याने फिर्यादीच्या डोक्यात लोखंडी कड्याने मारून,इतर साथीदार यांनी फिर्यादीस लाकडी फळीने व लोखंडी रॉडने मारहाण केली. फिर्यादी यांना त्यांचे ताब्यातुन सोडवण्यासाठी आकाश बोलसुरे व अभिषेक कोंडजे हे आले असता, आकाश व अभिषेक कोंडजे यांना हाताने,लाकडी फळीने,लोखंडी रॉडने व लोखंडी कड्याने मारहाण करून,त्यांचे हातातील लोखंडी हत्यार दाखवुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पालवे ९५०३९४१५४२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ३४९/२०२३,भादविक ३५३,३३२,३५२,३२४,३२३,१४३,१४७,१४९,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | मनपा अधिकारी,वय २४ वर्षे,रा.बोपखेल,पुणे |
| **आरोपीत** | फुटपाथवरील एक भाजी विक्रेता व इतर त्याचे पाच साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २५/७/२०२३ रोजी १८/३० वा.स्विट इंडीया चौक,खराडी,पुणे येथे सार्वजनिक रोडचे कडेला फुटपाथवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पुणे महानगरपालीका अतिक्रमण विभागामार्फत त्यांचे सहकारी अतिक्रमण निरिक्षक व इतर स्टाफ या पथकासह नमुद ठिकाणी सार्वजनिक रोडचे कडेला फुटपाथवर कारवाई करीत असताना, सदर ठिकाणी फुटपाथवर असलेले भाजी विक्रेते हे फिर्यादी यांचे अंगावर धावुन येवुन,त्यातील एका विक्रेता याने त्यांची भाजी सार्वजनीक रोडवर विस्कटुन,फिर्यादी सोबत वाद घालुन,त्याचे सोबत असलेले इतर भाजीविक्रेते याने फिर्यादीस धक्का-बुक्की करून,त्यांना अपशब्द वापरून,लाकडी फळी व लोखंडी खोरे दाडयांसहीत घेवुन फिर्यादी यांचे अंगावर मारण्यासाठी धावुन आले. तसेच फिर्यादी यांचे सहकारी याचे पाठीत लाकडी फळी मारून,हाताने मारहाण केली. तसेच तुम्ही अतिक्रमणवाले परत पुन्हा याठिकाणी आले तर,तुम्हा सर्वांना बघुन घेतो अशी धमकी देवुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घोडके ७५८८१७००८० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे १९८/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ७२ वर्षे,रा.फुरसुंगी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०७/२०२३ रोजी ०३/३० वा.स्वारगेट पी.एम.पी.एल. बस स्टॉप पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया स्वारगेट पीएमपीएल बस स्टॉप येथुन हडपसर बस मध्ये चढत असताना,कोंणीतरी अज्ञात इसमाने बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे गळयातील दोन सोन्याच्या बांगड्या १,००,०००/- रू किमतीच्या चोरी करून नेल्या आहेत. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, तारु ०२०/२४४५२७६९ |

**४**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे ४७४/२०२३,भादविक ३७९,५११,२८६,४२७,पेट्रोलियम अणि खनिज वाहक नळे (जमिन वापरणा-यांचे हक्क संपादन करणे),अधि.१९६२ कलम १५,१६,सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रति बंधक अधि.क.१९८४ क.३,अत्यावश्यक वस्तु अधि.क.१९५५ ३, ७(१), |
| **फिर्यादी** | गौरव गुप्ता,वय ३२ वर्षे,रा.लोणी-काळभोर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/०७/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा. म्हातोबाची आळंदी,ता.हवेली,जि.पुणे येथे एचपीसीएल कंपनीची पेट्रोल / डिझेल / केरोसिन वाहतुकीची मुबई-पुणे-सोलापुर मार्गावरची पाईप लाईन चॅनल नं. १७२.३ जवळ |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे लोणी-काळभोर,पुणे येथे एचपीसीएल. कंपनीत असिस्टंट मॅनेजर या पदावर आहेत. कोणीतरी अज्ञात इसमाने पेट्रोल / डिझेल / केरोसिन वाहतुकीची मुबई-पुणे-सोलापुर मार्गावरची पाईप लाईन चोरीचे उद्देशाने,पाईपलाईनचे नुकसान करुन,त्यास एक इंच व्यासाचा व ११२ से.मी.लांबीचा प्लास्टीकचा पाईप जोडुन चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दत्ता चव्हाण ९०११९०८६७४ / ९९८७४०८२९० |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ७६१/२०२३,भादविक ३५३,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | मनपा अधिकारी,वय-३२ वर्षे,रा.धनकवडी,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०७/२०२३ रोजी १७/०० वा.कोंढवा परिसरात भिमनगर येथील मनीष पार्क गेट नं.०२,कोंढवा-बुद्रुक, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पुणे महानगरपालिकेमध्ये सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक या पदावर आहेत. फिर्यादी हे कोंढवा परिसरात भिमनगर येथील मनीष पार्क गेट नं ०२,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालयाकडील मनपा अतिक्रमण विभागामार्फत कारवाई करीत असताना,यातील नमुद इसमांनी पोलिस स्टाफ व फिर्यादी यांचे अन्य सहकारी यांना अतिक्रमण हटविण्यापासुन मज्जाव करुन,अपशब्द वापरून, त्यांना धक्का-बुक्की करुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. विश्वास भाबड ९८५०२९९७७६ |

## <u>दि.२६/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५२३/२०२३,भादविक ३०७,३४ |
| **फिर्यादी** | मुकेश राजपुत,वय ४२ वर्षे,रा.शास्त्रीनगर,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | एक महिला व तीचा साथीदार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०७/२०२३ रोजी १९/३० वा.महाराष्ट्र हौसींग बोर्ड एम-१६,सैनिक बँक समोर,तिसरा मजला शास्त्रीनगर येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घरासमोर यातील नमुद महिला व व तीचा साथीदार इसम यांनी आपसात संगनमत करून,सदर महिला हिचेबरोबर झालेल्या वादातुन फिर्यादी यांचे अंगावर कॅन मधील रॉकेल ओतुन,लायटरने पेटवुन देवुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. (फिर्यादी यांचेवर सरकारी दवाखान्यात उपचार चालु आहेत.) |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), जयदीप गयकवाड ९८२१५११०५० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**